जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2021
सकाळ

# महाविद्यालये १५ सप्टेंबरपासून

**मुंबई :** कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे वर्षभरापासून बंद असलेली सर्व महाविद्यालये १५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत सुरू केली जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (ता. ५) मुंबईत माध्यमांशी बोलताना दिली. राज्यात पारंपरिक विद्यापीठे आणि त्या अंतर्गत येणारी सर्व महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक झाली. प्रत्येक विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राचा आढावा घेण्याच्या सूचना दिल्या. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू करण्याचा विचार आहे.

0 6 AUG 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना शुल्क सवलत

## कोरोनामुळे निर्णय; अधिविभाग, महाविद्यालयांना कार्यवाहीचे आदेश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांच्या विविध शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. त्याबाबतचा आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे देण्यात आला आहे. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव झाला असून, त्याबाबत कार्यवाही करण्याचा आदेश विद्यापीठ प्रशासनातर्फे अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांना दिला आहे.

२०१९-२० मधील उन्हाळी सत्र, मार्च २०२० च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये आयोजित परीक्षांमध्ये कॅरी फॉरवर्ड पद्धतीने निकाल जाहीर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे २० टक्के परीक्षा शुल्क महाविद्यालय, अधिविभागातर्फे विद्यार्थ्यांना परत दिले जाणार आहे. २०२०-२१ शैक्षणिक वर्षात अनुदानित महाविद्यालय व विद्यापीठ अधिविभागांतील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना, विविध गुणदर्शन, उपक्रम, कॉलेज, मॅगेझीन, संगणक, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी, यूथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही, त्या बाबींसाठीचे शुल्क माफ करण्यात



येणार आहे. विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांसाठीही शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयात ई-कंटेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने त्याबाबतच्या शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येईल. विद्यार्थ्यांद्वारे वसतिगृहाचा उपयोग झाला नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ केले जाणार आहे. जे विद्यार्थी २०२०-२१मध्ये पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्ष, अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, त्यांचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्क परत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क तीन ते चार हप्त्यांत भरण्याची सवलत देण्यात येणार असून, शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडविण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021
सकाळ

# एमपीएससी आयोगावर शिंदे, जाधव व दिघावकर

## दत्ता भरणेंच्या भेटीनंतर राज्यपालांची तत्काळ मंजुरी

**मुंबई, ता. ५ :** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावरील तीन सदस्यांच्या नियुक्तीवर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री दत्ता भरणे यांनी काल (ता. ४) राज्यपालांची भेट घेऊन संबंधित नियुक्त्यांना मान्यता देण्याची विनंती केली. त्यानंतर राज्यपालांनी या नियुक्त्यांना मंजुरी दिली. राज्य लोकसेवा आयोगातील सदस्यांच्या या रिक्त जागांवर देवानंद शिंदे, राजीव जाधव व प्रताप दिघावकर यांची नियुक्ती करण्यात



डॉ. देवानंद शिंदे



प्रताप दिघावकर

आली आहे. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, निवृत्त सनदी अधिकारी राजीव जाधव व निवृत्त आयपीएस अधिकारी प्रताप दिघावकर यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव

पान ९ वर »

## एमपीएससी आयोगावर शिंदे, जाधव व दिघावकर

» पान १ वरून

राज्य सरकारने राज्यपालांकडे पाठवला होता. राज्यपालांनी त्यास मंजुरी दिली. लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही रोजगाराची संधी न मिळालेल्या स्वप्नील लोणकर या युवकाच्या आत्महत्येमुळे राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी लोकसेवा आयोगाच्या कारभारावर टीका केली होती. त्यावेळी आयोगाकडून होणारी भरती प्रक्रिया गतिमान करण्यासह आयोगाच्या सदस्यपदाच्या रिक्त जागा ३१ जुलैपर्यंत भरण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती. त्यानुसार तीन सदस्यांची नावे निश्चित करून ती फाइल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे पाठविण्यात आली होती.

जनसंपर्क कक्ष

0 6 AUG 2021

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयांतील विविध शुल्कांत सवलत देणार

## कोरोनामुळे निर्णय : अडीच लाख विद्यार्थ्यांना दिलासा

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला. त्याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव करण्यात आला. या ठरावानुसार सवलत देण्याची कार्यवाही विविध अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांनी कार्यवाही करण्याची सूचना विद्यापीठाने गुरुवारी केली. त्यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २ लाख ५६ हजार २४२ विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना दिलासा मिळणार आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाबाबत अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना, विविध गुणदर्शन, उपक्रम, कॉलेज मॅगझीन, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी, युवा महोत्सव यावर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही. त्यामुळे यासाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करावे. प्रयोगशाळा, ग्रंथालयाची देखभाल आणि ग्रंथालयामध्ये ई-कंटेट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने त्याच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत द्यावी. वसतिगृह शुल्क पूर्णपणे माफ करावे. सन २०१९-२० मधील उन्हाळी सत्र मार्च २०२० च्या ऑक्टोबर अथवा नोव्हेंबर २०२० मध्ये आयोजित परीक्षांमध्ये कॅरी फॉरवर्ड पद्धतीने निकाल जाहीर करण्यात आले आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या २० टक्के परीक्षा शुल्क महाविद्यालय, अधिविभाग, विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना परत करायचे आहे. त्याबाबतचा प्रस्ताव पूरक कागदपत्रांसह संबंधित परीक्षा विभागाकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात यावे, अशी सूचना विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केली आहे.

### प्रलंबित शुल्कासाठी हप्त्यांची सवलत द्यावी

विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क तीन ते चार हप्त्यात भरण्याची सवलत द्यावी. शुल्क थकीत असेल, तर परीक्षेचा अर्ज अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्ष, अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचे देय असणारे परीक्षा, शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्क परत करण्याची सूचना विद्यापीठाने केली आहे.

### आजपासून सराव चाचणी

विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या ४३५ परीक्षा मंगळवार (दि. १०) पासून सुरु होणार आहे. ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या या परीक्षेसाठी आज, शुक्रवारपासून सराव चाचणी (मॉक टेस्ट) परीक्षा मंडळाकडून घेतली जाणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विविध शुल्कामध्ये सवलत देण्याबाबतची सूचना महाविद्यालय, अधिविभागांना परिपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2021
लोकमत

# डॉ. शिंदे, जाधव, दिघावकर 'एमपीएससी'च्या सदस्यपदी

## नियुक्तीच्या फाईलवर राज्यपालांची सही

**लोकमत न्यूज़ नेटवर्क**

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्यांच्या नियुक्तीच्या फाईलवर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अखेर बुधवारी रात्री उशिरा सही केली. राज्य सरकारने गुरुवारी याबाबत अधिसूचना काढली.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी राजीव जाधव आणि निवृत्त आयपीएस अधिकारी प्रताप दिघावकर यांची आयोगावर सदस्यपदी वर्णी लागली आहे.

एमपीएससी उमेदवारांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुलाखत प्रक्रिया पार पडणे गरजेचे आहे. त्यासाठी आयोगातील रिक्त पदांवर तातडीने नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण तातडीने त्याला मंजुरी द्यावी, अशी विनंती सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपालांकडे बुधवारी सायंकाळी ६ वाजता केली होती. त्यानंतर काही तासातच राज्यपालांनी फाईलवर स्वाक्षरी केली. एमपीएससी सदस्य पदासाठी सरकारने राज्यपालांकडे नावे पाठविल्याचे वृत्त 'लोकमत'ने सर्वप्रथम दिले होते. एमपीएससीच्या रिक्त सदस्यांच्या नियुक्तीसाठी राज्य सरकारने मागील आठवड्यात राज्यपालांकडे ३ नावे मंजुरीसाठी पाठवली होती. राज्यपाल महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत फाईलवर काही तासातच स्वाक्षरी केली.


डॉ. देवानंद शिंदे


प्रताप दिघावकर

'एमपीएससी'च्या सदस्यपदी नेमणूक झाल्याचा ई-मेल राज्य शासनाकडून गुरुवारी प्राप्त झाला. 'एमपीएससी'मध्ये काम करण्याची संधी मिळाली असल्याचा आनंद होत आहे.
**- डॉ. देवानंद शिंदे,**
माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2021
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## • महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी महत्त्वाची सूचना •

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थांनी शासन आणि विद्यापीठ यांची मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडून घेवून ते महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांच्या माहितीपुस्तिकेत छापणे महाविद्यालयांना बंधनकारक केले आहे. विद्यार्थी/पालकांनी ते माहिती पुस्तिकेत (Prospectus मध्ये) आवर्जून पहावे. याशिवाय नव्याने मान्यता मिळालेल्या अभ्यासक्रमांची व संबंधित महाविद्यालयांची माहिती www.unishivaji.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. शासन आणि शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमालाच विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा. मान्यता नसलेल्या काही संस्था व अनधिकृत महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असल्याचे खोटे सांगून त्यांच्या/संबधित अभ्यास केंद्रामार्फत (Study Centre) व्यावसायिक तंत्रज्ञान विषयक तसेच नियमित अभ्यासक्रम, AICTE, COA, UGC, NCTE,PCI अशा संबधित शिखर संस्थांच्या मान्यता नसतानाही चालविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अभ्यासक्रमांबाबत योग्य ती माहिती न घेता विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास शिवाजी विद्यापीठ त्यास जबाबदार राहणार नाही, याची कृपया नाद घ्यावी. तसेच दूरशिक्षण अभ्यासक्रमाबाबत UGC ची दि. 25/01/2016 व दि. 23/02/2018 रोजींची सूचना www.ugc.ac.in/deb/notice.html, या संकेत स्थळावर पहावी. याच बरोबर विद्यापीठाच्या पात्रता विभागामार्फतही सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना प्रवेश पात्रता व अन्य निकष याबाबत सविस्तर परिपत्रक पाठविण्यात येते. सदरची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध केली जाते याचीही विद्यार्थ्यांनी माहिती घेणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाची तसेच शासन व शिखर संस्था यांची मान्यता नसलेल्या कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची राहील. त्याबाबत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून पालक आणि विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची संलग्नता असलेल्या अभ्यासक्रमांस उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रावरुन/संकेतस्थळावरुन माहिती घेवून खात्री झाल्यानंतरच प्रवेश घ्यावा आणि संभाव्य नुकसान टाळावे.

कोल्हापूर
दि. 06/08/2021

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 AUG 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ देणार प्रवेश शुल्कात २० टक्के सवलत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रवेश शुल्कात सूट देण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. त्यानुसार २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या प्रवेशावेळीच शैक्षणिक आणि परीक्षा शुल्क वगळता २० टक्के सवलत द्या, अशा सूचना महाविद्यालये आणि अधिविभागांना परिपत्रकाव्दारे विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना २० टक्के प्रवेश शुल्कात सुट दिली जाणार आहे. carry forward पद्धतीने निकाल जाहीर करण्यात आले, अशा अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना २० टक्के परीक्षा फी परत करायची असल्याने याबाबत प्रस्ताव पूरक कागदपत्रासह परीक्षा विभागाकडे सादर करायचा आहे. २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणारे जिमखाना, विविध गुणदर्शन उपक्रम, कॉलेज मॅगझीन, युथ फेस्टिवल आदी वापरात न आलेले शुल्क परत करावयाचे आहे. तसेच २०२०–२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश शुल्क चार हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. प्रयोगशाळा व ग्रंथालय देखभाल व ग्रंथालयात ई–कन्टेंट विकत घेण्यात खर्च झाल्याने यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे २० टक्के शुल्कप्रमाणे प्रत्येक अभ्यासक्रमाची वेगवेगळी रक्कम मिळणार, याची विद्यार्थ्यांनीही दखल घ्यावी.



**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर प्रवेशं प्रक्रियेसंदर्भात निर्णय**

## प्रवेश शुल्कात १०० टक्के सवलत

ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा कोरोनाने मृत्यू झाला आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात १०० टक्के सवलत दिली जाणार आहे. याची दखल घेत महाविद्यालय व अधिविभागांनी आपआपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १०० टक्के प्रवेश शुल्कात सवलत देवून, त्याचा अहवाल विद्यापीठाला सादर करावा.

### शासन आदेशाचे पालन करावे

महाविद्यालय व अधिविभागांनी शासन आदेशानुसार प्रवेश शुल्कात सवलत द्यावी. तसेच यापुर्वी वापरात न आलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे. विद्यापीठ प्रशासनाने प्रवेश शुल्कातील सवलतीसंदर्भात ई–मेलव्दारे महाविद्यालयांना सूचना केलेल्या आहेत, असे कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021
तरुण भारत

# विद्यापीठातर्फे आजपासून ५० गुणांची मॉकटेस्ट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील मार्च-एप्रिल २०२१ च्या पदवीच्या काही परीक्षा १० ऑगस्टपासून तर उर्वरीत पदवी व पदव्युत्तरच्या ऑनलाईन परीक्षा १८ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. या परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांची ५० गुणांसाठीची मॉकटेस्ट आजपासून सुरु होणार आहे. अशी माहिती मुल्यमापन व परीक्षा मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या ४३५ परीक्षांपैकी काही १० ऑगस्टपासून तर उर्वरीत परीक्षा १८ ऑगस्टपासून ऑनलाईन होणार आहेत. बी. ए., बी. कॉम., बीएस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., बी. बी. ए., बी. सी. ए., बी. सी. एस., आणि बी. व्होकसह व्यवसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या ऑनलाईन परीक्षा सप्टेंबर अखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. सर्वच अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांसाठी मॉकटेस्ट घेतली जाणार आहे. ही मॉकटेस्ट जनरल नॉलेजवर आधारीत असून २५ प्रश्नांसाठी ५० गुण असणार आहेत. याची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तरी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

0 6 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य आयोगाला मिळाले सदस्य

## डॉ. देवानंद शिंदे, प्रताप दिघावकर, राजीव जाधव यांची नियुक्ती : भरती प्रक्रियेला येणार वेग

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावर (एमपीएससी) डॉ. देवानंद शिंदे, डॉ. प्रताप दिघावकर आणि राजीव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतच्या प्रस्तावावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची सही झाल्यानंतर राज्य सरकारने या सदस्यांच्या नियुक्तीची अधिसूचना काढली. याशिवाय आयोगाच्या आणखी एका सदस्याचा कालावधी लवकरच संपत असून त्या जागेवरही तातडीने नियुक्ती करण्यात येणार आहे, अशी माहिती सामान्य प्रशासन राज्य मंत्री दत्तात्रय भरणे यांनी याबाबत माहिती दिली.



**डॉ. देवानंद शिंदे**
हे शिक्षण क्षेत्रातील असून त्यांनी काही काळ कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापिठाचे कुलगुरु म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घकालीन अभ्यासामुळे ही नियुक्ती करण्यात आली आहे.



**प्रताप दिघावकर**
हे नाशिक परिक्षेत्राचे महानिरीक्षक म्हणून निवृत्त झाले आहेत. पोलीस प्रशासनातील एक उत्तम अधिकारी आणि प्रशासक म्हणून त्यांची कारकिर्द यशस्वी ठरली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यात त्यांनी काम केले आहे.



**राजीव जाधव**
हे सनदी अधिकारी असून त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त, दुग्धविकास सचिव आदी विविध पदांवर काम केले आहे. प्रशासनातील दीर्घकालीन अनुभावामुळे त्यांचे नाव देण्यात आले होते.

**राज्यपालांची घेतली होती भेट**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांच्या रिक्त पदावरील नियुक्तीला मान्यता देण्याबाबत मंत्री भरणे यांनी बुधवारी राज्यपालांची भेट घेतली होती. या सदस्यांची नियुक्ती केल्यामुळे आयोगामार्फत राज्यातील भरण्यात येणाऱ्या पदांच्या उमेदवार नियुक्ती प्रक्रिये देखील गती येणार आहे. याचा लाभ लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या उमेदवारांनाही होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

MPSC
Maharashtra public service commission

**दोन वर्षांपासून दोनच सदस्य**

नियुक्त केलेल्या या तिनही सदस्यांना पदभार स्वीकारल्यानंतर ६ वर्षांचा अथवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंतचा कालावधी मिळणार आहे. गेली दोन वर्षांपासून राज्य सरकारकडून आयोगाला योग्य संख्येत सदस्य नियुक्ती मिळालेली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्वायत्त असला तरीही त्याला पुरेसे सदस्य मिळालेले नव्हते. एक सचिव आणि पाच सदस्य अशी या आयोगाची रचना आहे. तथापि गेली दोन वर्षांपासून केवळ सचिव आणि एक सदस्य असे दोघेच काम पहात होते.

पान ९ पहा

# राज्य आयोगाला मिळाले सदस्य

पान १ वरुन

आयोगातील तब्बल ४ जागा रिक्तच होत्या.

**नियुक्तीमुळे ताण होणार कमी**

रिक्त जागांमुळे अनेक विभागातील उमेदवारांच्या नियुक्त्याही गेल्या दोन वर्षांपासून रखडल्या होत्या. त्यामुळे कामाचा ताणही या दोन सदस्यांना सहन करावा लागत होता. या सदस्यांच्या नियुक्तीनंतर त्यांच्यावरील ताणही दूर होणार आहे. या तीन सदस्यांच्या नियुक्तीनंतर आयोगातील एकूण संख्या पाच होणार आहे.

**अवघ्या ३७७ उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण**

मंत्री भरणे म्हणाले, आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षा (४९६ पदे), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा (१ हजार १४५ पदे), महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा परीक्षा (४३५ पदे), महाराष्ट्र वनसेवा परीक्षा (१०० पदे), महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा परीक्षा (१६ पदे) अशा एकूण २ हजार १९२ पदांसाठी एकूण ६ हजार ९९८ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र आहेत. त्यापैकी अवघ्या ३७७ उमेदवारांच्या मुलाखती झाल्या असून उर्वरित ६ हजार ६२१ उमेदवारांच्या मुलाखती होणे बाकी आहे. ती जबाबदारी पार पडणे आता शक्य होणार असून किमान ही २१९२ पदे लवकरच भरली जातील, असा विश्वास मंत्री भरणे यांनी यावेळी व्यक्त केला.

**सदस्य संख्या वाढीचाही प्रस्ताव**

मंत्री भरणे म्हणाले, केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या लोकसेवा आयोगाची सदस्य संख्या वाढवण्याच्या अनुषंगानेही राज्यपाल कोश्यारी यांच्यासोबत चर्चा झाली. महाराष्ट्र आयोगाच्या एक सदस्यांचा कार्यकाल लवकरच पूर्ण होत आहे. त्यांची रिक्त होणारी जागा भरण्यासाठीही लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे राज्यपालांना सांगितले आहे. हे दोन्ही प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही राज्यपाल म्हणाल्याचे भरणे यांनी सांगितले. या सदस्य नियुक्तीमुळे भरतीप्रक्रियेला देखील वेग येणार असून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना दिलासा मिळणार आहे. पाच विभागातील २१९२ पदांच्या मुलाखतीसाठी ६ हजार ९९८ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यांच्या मुलाखती घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या उमेदवारांना नियुक्ती देणेही राज्य सरकारला शक्य होणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021

तरुण भारत

# विद्यापीठातर्फे करंजफेण, सावर्डीत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडे पुणे येथील नॉर ब्रॅमसे, ग्लोबल केअर यांच्या सीएसआर फंडातून तसेच वर्क फॉर इक्वॅलिटी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून या जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ही मदत शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शाहूवाडी तालुक्यातील करंजफेण, पाल आणि सावर्डी गावातील पूरग्रस्तांना धान्याच्या कीटसह वाटप केली. त्यामुळे या परिसरातील ७०० कुटुंबांना महापुराच्या काळात आधार मिळाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शिवाजी विद्यापीठाचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलमेंटच्या समाजकार्य अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी ही मदत वाटप केली. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड आणि समाजकार्य अधिविभागातील सहायक संचालक अमोल मिणचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांच्या सहाय्याने ही मदत गरजूंपर्यंत पोहोचविण्यात आली. करंजफेण, पाल आणि सावर्डी या गावातील सत्तर टक्क्यांहून अधिक घरे पाण्यात होती. १२ घरे अतिवृष्टीने जमीनदोस्त झाली आहेत. शेतीचेही प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे सामाजिक संस्थांकडून आलेली मदत शिवाजी विद्यापीठाने दुर्गम भागातील पूरग्रस्तांपर्यंत पोहोचवली. यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अधिविभागातील विद्यार्थी आणि शिक्षक करंजफेण परिसरात दोन वर्षापूर्वी ग्रामीण विकासाचा आढावा घेण्यासाठी आठवडाभर मुक्कामी होते. या काळात या विद्यार्थ्यांचे संबंधित गावकऱ्यांशी ऋणानुबंध जुळले होते. विद्यार्थी मदत साहित्य घेऊन गावात आल्याने ग्रामस्थांचे डोळे भरून आले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021
पुढारी



# डॉ. देवानंद शिंदे, जाधव, दिघावकर 'एमपीएससी'च्या सदस्यपदी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्यपदी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी राजीव जाधव आणि निवृत्त आयपीएस अधिकारी प्रताप दिघावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदस्यांच्या नियुक्तीच्या फाईलवर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवारी रात्री उशिरा सही केली. त्यानंतर राज्य सरकारने गुरुवारी याबाबत अधिसूचना काढली. आयोगावर सदस्यांची नियुक्ती झाल्याने एमपीएससी उमेदवारांच्या भरती प्रक्रियेला वेग येणार आहे.

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून एमपीएससी उमेदवारांची भरती प्रक्रिया रखडली आहे. राज्य सरकार तातडीने १५ हजार ५११ पदे भरणार आहे. ही पदे भरण्यासाठी उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया पार पडणे गरजेचे आहे. या मुलाखत प्रक्रियेला वेग येण्यासाठी आयोगातील रिक्त पदांवर तातडीने नियुक्ती होणे आवश्यक होते. आता तीन सदस्यांची नियुक्ती झाल्याने या भरती प्रक्रियेला गती मिळेल.

आगामी काळात लोकसेवा आयोगावरील सदस्य संख्या सहा वरून १३ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव असल्याचे सामान्य प्रशासन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. यापूर्वी प्राचार्य सी. रा. तावडे, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅरिस्टर पी. जी. पाटील, प्राचार्या सुमती पाटील, डॉ. एम. डी. तावडे व प्रा. टी. ए. शिवारे यांनी एम.पी.एस.सी. वर सदस्य म्हणून काम पाहिले आहे.

माजी कुलगुरू शिंदे यांनी पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण केला. तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रभारी कुलगुरू म्हणून काम पाहिले. ऑक्सफर्ड विद्यापीठात एक महिन्याचा अभ्यास दौरा त्यांनी केला. सध्या ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 AUG 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## महाविद्यालयातील प्रवेशासंबंधी महत्त्वाची सूचना

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालये वा मान्यता प्राप्त संस्थांनी शासन आणि विद्यापीठ यांची मान्यता असलेल्या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडून घेऊन ते महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांच्या माहितीपुस्तिकेत छापणे, महाविद्यालयांना बंधनकारक केले आहे. विद्यार्थी/पालकांनी ते माहिती पुस्तिकेत (Prospectus मध्ये) आवर्जून पहावे. याशिवाय नव्याने मान्यता मिळालेल्या अभ्यासक्रमांची व संबंधित महाविद्यालयांची माहिती www.unishivaji.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. शासन आणि शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमालाच विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा. मान्यता नसलेल्या काही संस्था व अनधिकृत महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असल्याचे खोटे सांगून त्यांच्या/संबंधित अभ्यास केंद्रामार्फत (Study Centre) व्यावसायिक तंत्रज्ञान विषयक तसेच नियमित अभ्यासक्रम, AICTE, COA, UGC, NCTE, PCI अशा संबंधित शिखर संस्थांच्या मान्यता नसतानाही चालविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अभ्यासक्रमाबाबत योग्य ती माहिती न घेता विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास शिवाजी विद्यापीठ त्यास जबाबदार राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच दूरशिक्षण अभ्यासक्रमाबाबत UGC ची दि. 25/01/2016 व दि. 23/02/2018 रोजीची सूचना www.ugc.ac.in/deb/notice.html या संकेत स्थळावर पहावी. याच बरोबर विद्यापीठाच्या पात्रता विभागामार्फतही सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना प्रवेश पात्रता व अन्य निकष याबाबत सविस्तर परिपत्रक पाठविण्यात येते. सदरची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध केली जाते. याचीही विद्यार्थ्यांनी माहिती घेणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाची तसेच शासन व शिखर संस्था यांची मान्यता नसलेल्या कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची राहील. त्याबाबत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन पालक आणि विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची संलग्नता असलेल्या अभ्यासक्रमास उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रावरून / संकेतस्थळावरून माहिती घेऊन खात्री झाल्यानंतरच प्रवेश घ्यावा आणि संभाव्य नुकसान टाळावे.

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोल्हापूर
दि. 06/08/2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठ परीक्षांसाठी आजपासून मॉक टेस्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठअंतर्गत २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील मार्च-एप्रिल २०२१ च्या काही पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा १० ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची ५० गुणांची मॉक टेस्ट शुक्रवारपासून (दि. ६) सुरू होणार आहे.

विद्यापीठअंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या ४३५ परीक्षांपैकी काही अभ्यासक्रमांच्या १० ऑगस्ट, तर उर्वरित परीक्षा १८ ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने सुरू होणार आहेत. बी. ए., बी. कॉम., बीएस्सी., एमए., एम. कॉम., एम. एस्सी., बीबीए., बीसीए., बीसीएस., बी. व्होक. यासह व्यावसायिक अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे.

सप्टेंबरअखेरपर्यंत परीक्षा सुरू राहणार आहेत.

0 6 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यार्थ्यांना प्रलंबित परीक्षा शुल्क भरण्यास चार हप्त्यांची सवलत द्यावी

## विद्यापीठाचे महाविद्यालये, अधिविभागांना परिपत्रक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्ष अंतिम सत्र परीक्षेस उत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्क परत करण्यात यावे, विद्यार्थ्यांकडे प्रलंबित शुल्क चार हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागप्रमुखांना काढले आहेत.

२०१९-२० मधील उन्हाळी सत्र मार्च २०२० च्या ऑक्टोबर, नोव्हेबर २०२० मध्ये आयोजित परीक्षांमध्ये कॅरी फॉरवर्ड पद्धतीने निकाल जाहीर केलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमांचे २० टक्के परीक्षा



शिवाजी विद्यापीठातून...

शुल्क महाविद्यालय, अधिविभाग, विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात येणार आहेत. याबाबतचा प्रस्ताव कागदपत्रासह संबंधित परीक्षा विभागाकडे सादर करणे गरजेचे आहे.

प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने या शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात यावी. विद्यार्थ्यांद्वारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. शैक्षणिक वर्ष २०२१ २२ मध्ये जे विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेशित होणार आहेत त्यांचे परत करावयाचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्का समायोजन करण्यात यावे, असे कुलसचिवांनी परिपत्रकात म्हटले आहे.

२०२०-२१ शैक्षणिक वर्षाबाबत अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन, उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझिन शुल्क, संगणक शुल्क, क्रीडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि यूथ फेस्टिवल या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च झालेला नाही. त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे, असे परिपत्रकात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठातर्फे २८ रोजी राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी https://forms.gle/SeGhBSdNV3eZxxsAA या लिंक वरून नोंदणी करावी. वेबिनार संदर्भातील अपडेटस्साठी https://t.me/joinchat/wJ5tRR9PxP83NzE1 या लिंक द्वारे टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.